## ...दकीय

१९७८ सालच्या मार्च महिन्यात मुंबईत वरळीला एका झोपडपट्टीमध्ये एका स्त्रीवर बलात्कार झाल्याचे निदर्शनास आले. बलात्कार! मानवतेला काळीमा फासणारी घटना! अशा घटना खेड्यात आणि शहरातही प्रत्यही घडत आल्या आहेत. परंतु आजपर्यंत अगतिकतेपायी स्त्रिया त्याबाबत मूग गिळून गप्प बसत होत्या आणि समाज त्याकडे बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करत होता. पण, परिस्थितीने पलटी खाल्ली आणि अशा घटनांकडे समाजाचे लक्ष वेधले जाऊ लागले. मुंबई झोपडपट्टी रहिवासी संघाने प्रचंड मोर्चा काढून या बलात्काराविरुद्ध आपला निषेध नोंदविला. नुकत्याच घडलेल्या हैदराबादमधील बलात्कार प्रकरणीही उग्र निदर्शने झाली. ही निदर्शने म्हणजे स्त्रीवरील अत्याचार-विरोधी चळवळीची केवळ नांदी ठरली पाहिजेत. त्या चळवळीची इतिश्री नव्हे. जाहिराती, चित्रपट, नाटक आणि वाङमय यामध्ये स्त्रीचे चित्रण अशा तऱ्हेने केलेले असते की पुरुषाच्या वासनातृप्तीसाठीच आपला जन्म आहे, आपण भोगवस्तू आहोत असे स्त्रियांच्या मनावर बिंबवले जाते. जोपर्यंत समाज स्त्रीकडे भोगवस्तू म्हणूनच पहात रहाणार तोपर्यंत स्त्रीवरील बलात्काराच्या आणि अत्याचाराच्या घटना घडतच रहाणार. स्त्रियांवरील अत्याचार बंद व्हावेत अशी प्रामाणिक इच्छा असेल तर स्त्रीकडे पहाण्याचा समाजाचा विकृत दृष्टिकोन बदलण्यासाठी व्यापक चळवळ हाती घेणे आवश्यक आहे.

स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून पाहिले जाणे हा स्त्रीच्या कनिष्ठ सामाजिक स्थानाचाच एक भाग आहे. तेव्हा स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने स्थान मिळवून देणे, तिला मुक्त जीवन जगू देणे हेच या चळवळीचे अंतिम उद्दिष्ट राहील. अर्थात् या चळवळीत स्त्रियांनी आपला महत्वाचा वाटा उचलला पाहिजे. अज्ञान, अंधश्रद्धा; आर्थिक परावलंबन, स्वतःकडे भोगवस्तू म्हणून पहाण्याची दृष्टी; स्वतःमधील कनिष्ठत्वाची अथवा न्यूनगंडाची भावना या साऱ्यांमधून स्वतःची सुटका करून घेऊन मुक्तीचा आणि प्रगतीचा मार्ग आक्रमला पाहिजे. या दृष्टीनेच ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून पाळण्याचे आवाहन आम्ही गेल्या अंकात केले होते. त्याला भरपूर प्रतिसाद मिळाला. पुणे, कासारवाडी, पिंपरी, मुंबई, कोल्हापूर, कऱ्हाड, नगर, संगमनेर, औरंगाबाद वगैरे ठिकाणी ८ मार्च दिन पाळल्याचे वृत्त हाती आले आहे. स्त्रीचं दुय्यमत्व नष्ट झाले पाहिजे. दारुबंदी आणि हुंडाबंदी झाली पाहिजे. स्त्रीची घरात आणि घराबाहेर होणारी पिळवणूक थांबली पाहिजे, स्त्रियांच्या रोजगाराचा प्रश्न सोडवून स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करून दिले पाहिजे, घरकामातून स्त्रीची सुटका व्हावी म्हणून स्वस्त स्वयंपाकगृहे, धुलाईकेंद्र, पाळणाघरे वगैरे सोयी उपलब्ध झाल्या पाहिजेत वगैरे मागण्या पुढे ठेवून निरनिराळ्या ठिकाणी सभा घेतल्या गेल्या. या सभांचे जे अहवाल हाती आले त्यापैकी काही आम्ही या अंकात छापत आहोत. बायजाच्या वाचकांना ते नक्कीच उद्बोधक वाटतील असा विश्वास वाटतो. स्त्रीच्या जाणिवा वाढीस लागल्या असल्या तरी तिच्या राजकीय जाणिवा अद्याप अविकसित आहेत हे विधानसभेच्या निवडणुकीत बायजांनी मतदान कसे केले या लेखातील काही स्त्रियांच्या मुलाखतीवरून दिसून येते. अनेक स्त्रियांनी नवऱ्याने सांगितले म्हणून विशिष्ट उमेदवाराला मत दिले. जणू काही निवडणुकीत मतदान करणे म्हणजे सत्यनारायण पूजेच्या वेळी अगर लग्नकार्यात पतीच्या हाताला हात लावणे होय. स्वतःच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाची जाणीवच अनेक स्त्रियांमध्ये रुजलेली नाही हे त्यावरून दिसते. त्यांची ही उदासिनता त्यांच्या मागासलेपणामुळे असली तरी निवडणुकीबाबत उदासिनतेची भावना वाढीस लागल्यासारखी दिसते याचीही नोंद घेणे आवश्यक आहे. जोपर्यंत मूठभर लोकांच्या हातात संपत्ती आणि सत्ता केंद्रित झाली आहे तोपर्यंत कोणताही पक्ष निवडून सत्तेवर आला तरी आपल्या परिस्थितीत फरक पडणार नाही; बेकारी कमी होणार नाही की गरिबी

हक्कदार नाही अशी भावना जनसामान्यांमध्ये फैलावत आहे. एका शेतमजूर स्त्रीने दिलेली मुलाखत याबाबतीत बोलकी आहे. ती म्हणते, ‘ कशाला द्याचं मत ! आतापोतर मत दिवून काई उपांग झालाय का ! आमची खुरप दुरी न्हाय सुटली. कुनी बी निवडून आला तरी आमाला सारकाच. त्यो काय गरीबासाठी निवडून जातोय ? ’ अर्थात् समाजमुक्तीच्या लढ्याच्या दृष्टीने ही जाणीवही महत्त्वाची ठरते.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कष्टकरी वर्गावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी आज आदिवासी, दलित, शेतमजूर, औद्योगिक कामगार उभे ठाकले आहेत. परंतु या कष्टकऱ्यांना निकम्मा करण्याचे काम दारुबाजी, मटका यासारखी भांडवलशाहीमध्ये बुद्धिपुरस्सर वाढू दिली जाणारी व्यसने करत आहेत. तुटपुंजी मिळकत दारूच्या पेल्यात बुडवून दारूबाजी अनेकांचे मेंदू बधीर करत आहे तर झोपडीत राहून राजवाड्याच्या आणि कांदाभाकरीही नसलेले रिकामे ताट समोर ठेवून पंचपक्वान्नांच्या राशींच्या स्वप्नात मशगुल ठेवून कष्टकऱ्यांचे हातपाय निष्क्रिय बनवण्याचे काम मटका करीत आहे. ‘छक्का पंजा’ या कथेतील काशीसारखी एखादीच स्त्री स्वतःच्या पोराची उपासमार डोळ्यासमोर दिसत असता अनेकांच्या तोंडचा घास हिसकावून घेणारा मटक्याचा पैसा घराचा उंबरठा ओलांडून आत येऊ देत नाही. नाहीतर गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्व वर्गातील अनेक लोक कष्टावाचन मोठ्या प्रमाणात पैसा कसा घरात येईल याचा शोध घेत असताना दिसतात. स्त्रीमुक्तीचा लढा हा समाजमुक्तीच्या लढ्याचाच एक भाग आहे हे लक्षात घेऊन स्त्रियांनी पुरुषांना या व्यसनातून मुक्त होण्यास मदत करून भांडवलशाहीविरुद्ध झगडण्यास समर्थ बनविले पाहिजे. तरच स्त्रीमुक्तीचे आपले स्वप्न साकार होईल.

❋

---

# मानवी हक्कांच्या रक्षणाची ही एक तऱ्हा !

आंध्रमध्ये एका महिलेवरील बलात्काराच्या प्रकरणांतून हैदराबादमध्ये उसळलेली दंगल, त्यातून राज्यात अनेक ठिकाणी पसरलेले पोलिसविरोधी वातावरण आणि त्यातून झालेली आंदोलने–निदर्शने हा सारा प्रकार अवघ्या देशभर गाजला. ज्या बलात्कार प्रकरणामधून ही सारी अशांतता माजली त्याची हकीगत आता बाहेर आली आहे.

ता. २९ मार्चला रात्री या प्रकाराचा प्रारंभ झाला. त्या दिवशी रात्री साडेबारानंतर रमेझा बी आणि अहमद हुसेन हे जोडपे सिनेमाहून परत येत होते. आदिकमेट विभागात गस्तीवर असणाऱ्या पोलिसांनी त्यांना अडविले, ते दोघेही पती–पत्नी नसल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवला. अहमदला अलग करून त्याच्याकडे काही रकमेची मागणी केली आणि या रकमेची व्यवस्था होईपर्यंत रमेझा बीला ठाण्यावर अडकवून ठेवले. अहमद परत येईपर्यंत तिच्यावर या ठाण्यात बलात्कार करण्यात आला आणि याविरुद्ध अहमदने आवाज उठविताच त्यालाही व्यवस्थित ‘प्रसाद’ देण्यात आला. जवळच्याच फीवर हॉस्पिटल दवाखान्यात त्याला नेले असता तो मरण पावला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. हे आरोप संबंधित संशयितांवर ठेवण्यात आले आहेत.

परंतु अहमदचे निधन झाल्याचे समजताच रमेझा बी आणि तिचे काही नातेवाईक अथवा शेजारी यांनी त्याचे शव आदिकमेट पोलिस ठाण्याच्या व्हरांड्यात आणून ठेवले व पोलिस अत्याचाराला अचानक वाचा फुटली.

रमेझा बीचे रडणे–भेकणे ऐकून सुमारे २००० लोकांचा समुदाय तेथे जमा झाला आणि त्याने सरळ पोलिस ठाण्यावर हल्ला चढविला.

रविवार सकाळ, दि. ९–४–१९७८

---